**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः12.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- प्रार्थनास्थळांवर भोंग्यांसाठी सरसकट परवानगी नाही.
- विधीमंडळाच्या दोन्ही सदनात अर्थसंकल्पाविषयी चर्चा सुरू;
- शासनाच्या सर्व विभागांची माहिती जनतेला एकाच संकेतस्थळावर मिळावी , यासाठी 'स्वॅस' ही प्रणाली विकसित
- केंद्र सरकार पुढील तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडणार आणि,
- छत्रपती संभाजी महाराज यांना बलिदान दिनी सर्व स्तरातून अभिवादन

**विधी मंडळ**

प्रार्थनास्थळांवर भोंग्यांची परवानगी सरसकट दिली जाणार नाही. यासाठी परवानगी घ्यावी लागेल. तसंच सकाळी 6 ते रात्री 10 या वेळेतच भोंगे लावता येतील. मात्र भोंग्यांच्या आवाजाची मर्यादा आणि या बाबतीतल्या नियमांच्या पालनाची जबाबदारी संबंधित पोलिस ठाण्याच्या निरिक्षकांवर सोपविण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली. भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना फडणवीस बोलत होते. भोंग्यांसंदर्भात नियमावली असली तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याचं त्यांनी मान्य केलं. मात्र आता पोलिस निरीक्षकांना प्रार्थनास्थळी जाऊन पाहणी करण्याचे निर्देश दिले जातील, नियमांचं उल्लंघन होत असेल, तर त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळास कळवणं बंधनकारक असेल आणि सर्व नियमांचं तंतोतंत पालन केलं जाईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

**दारूदुकान-स्थलांतर**

दारूबंदी अंमलात आणण्यासाठी गावात झालेल्या एकंदर मतदानाच्या 75 टक्के मतदारांनी दारूबंदीच्या बाजूनं मतदान केलं, तर दारू दुकानाची मान्यता रद्द करण्याच्या दृष्टीनं नियमात आवश्यक बदल करण्यात येईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधासभेत दिलं. तसंच गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय यापुढे दारू दुकानांना स्थलांतराची परवानगी देण्यात येणार नाही, अशी घोषणाही पवार यांनी काल विधानसभेत केली.

**अर्थसंकल्प-चर्चा**

विधीमंडळाच्या दोन्ही सदनात काल अर्थसंकल्पाविषयी चर्चा सुरू झाली. राज्याची आर्थिक स्थिती ढासळली असल्याचं या अर्थसंकल्पांत प्रतिबिंबित झालं आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत चर्चेला सुरवात करताना केली. महिलांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पांत कोणतीही भरीव तरतूद नसल्याचं ते म्हणाले. तर निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्षानं केवळ आकर्षक घोषणा करत आश्वासनांचा पाऊस पाडला, मात्र अर्थसंकल्पात याची अंमलबजावणी केली नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत केली.हा अर्थसंकल्प राज्याला कर्जाच्या खाईत ढकलणारा असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.
एवढ्या मोठ्या महसुली तुटीचा अर्थसंकल्प इतिहासात पहिल्यांदाच सादर झाला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प बडा घर पोकळ वासा असल्याचं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मांडलं. हा अर्थसंकल्प गरीब, कष्टकरी, कामगार, महिला, शेतकरी आणि युवा वर्गाला पुढे घेऊन जाणारा असल्याचं मत भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत व्यक्त केलं. हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि संतुलित असल्याचं ते म्हणाले. आर्थिक शिस्त बिघडल्याचा विरोधकांचा आरोप खोटा असून कृषी, रोजगार, सामाजिक विकास या सर्व क्षेत्रांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प असल्याचं शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी सांगितलं. विकासचक्राला गती देण्याचं काम या अर्थसंकल्पातून झाल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितलं.

**स्वॅस**

शासनाच्या सर्व विभागांची माहिती जनतेला एकाच संकेतस्थळावर मिळावी , यासाठी 'सीएम डॅश बोर्ड' म्हणजे 'स्वॅस' (SWaaS) प्रणाली विकसित करण्यात येत आहे. शासनाच्या धोरणात्मक योजना, त्यांची प्रगती, अद्ययावत माहिती, थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजना, विभागनिहाय माहिती यामध्ये असावी आणि यासाठी इतर कोणत्याही संकेतस्थळावर जाण्याची गरज भासू नये, या उद्देशानं ही प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामध्ये 34 विभागांच्या संकेतस्थळाच्या सेवांबरोबरच न्यायालय, रेरा तसंच कायदा आणि सुव्यवस्था या सेवांचाही या प्रणालीत समावेश करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत बैठकीत दिले.

**अधिवेशन संसद**

केंद्र सरकार पुढील तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल राज्यसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना दिली. 2025-26 मध्ये दोनशे कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडली जाणार असल्याचं नड्डा यांनी सांगितलं. कर्करोगाच्या रुग्णांवर तपासणीनंतर 30 दिवसांच्या आत उपचार सुरू होत असून राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत, सरकार, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी काम करत असल्याचंही नड्डा यांनी म्हटलं आहे.

**रस्ते अपघात नोंद**

राज्यात गेल्या तीन वर्षांत एक लाखापेक्षा जास्त रस्ते अपघातांची नोंद झाली असून त्यात जवळपास 46 हजार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी काल विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. वाहनचालकाची मद्यपान चाचणी करणाऱ्या यंत्रासोबतच, अंमली पदार्थांचं सेवनाची चाचणी करणारी यंत्रं मागवण्याची प्रक्रिया राज्य सरकार राबवत असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. राज्यानं अद्याप महामार्गांवर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम लागू केलेली नसल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**बलिदान दिन**

छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला विधानभवनात पुष्प वाहून अभिवादन केलं. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केलं. धुळे शहरात छत्रपती संभाजी राजे स्मारक समिती तसंच जिल्हा शिवसेनेच्या वतीनं नव्यानं उभारण्यात आलेल्या शंभू तीर्थ इथं छत्रपती संभाजी राजे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं. रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वरमधल्या कसबा इथे झालेल्या हिंदू धर्मरक्षण दिन कार्यक्रमात मंत्री नीतेश राणे यांनी छत्रपती संभाजी महाजांना अभिवादन केलं. हिंदू धर्मरक्षणाची शपथ प्रत्येकानं घेतली पाहिजे; राजांना आणि त्यांच्या विचारांना हृदयात ठेवलं पाहिजे,' असं राणे यावेळी म्हणाले.

**होळी**

शिमगा अर्थात होळी हा कोकणातला अत्यंत महत्त्वाचा सण. त्याविषयी सांगत आहेत आमचे रत्नागिरीचे प्रतिनिधी...

**कोकणी माणूस मुळात उत्सवप्रिय. त्यातही फाल्गुन शुद्ध पंचमी ते गुढीपाडवा या कालावधीचं महत्त्व तर रत्नागिरीतल्या प्रत्येक गावासाठी अनन्यसाधारण असतं. शिशिराची पानगळ संपून नवपालवीच्या वसंत ऋतूची चाहूल लागतानाच्या या काळात उत्साहाचं वातावरण असतं. कामासाठी बाहेरगावी स्थलांतरित झालेले चाकरमानी एक वेळ दिवाळीत गावी येतीलच असं नाही; पण शिमग्याला मात्र ते गावाला आले नाहीत असं होत नाही. या कालावधीत प्रत्यक्ष ग्रामदेवता पालखीत बसून घरोघरी येत असते. देवच आपल्या घरी येणार म्हटल्यावर रत्नागिरीकरांच्या आनंदाला पारावार नसतो. त्या आनंदातच गावकरी देवतांची पालखी खांद्यावर, डोक्यावर घेऊनही नृत्य करतात. गावकरी एकत्र येऊन आपल्या गावातल्या प्रथेनुसार आंब्याची किंवा सुरमाडाची होळी आणून ती उभी करतात. दुष्प्रवृत्तींची होळी करण्याचा संदेश देणारा होम त्रयोदशी ते पौर्णिमेपर्यंतच्या काळात केला जातो. संकासुर, खेळे, नमन, डेरा ओढणं अशा वेगवेगळ्या लोककलांचं सादरीकरण होत असतं. उभी केलेली होळी गुढीपाडव्याला तोडल्यावर उत्सवाची सांगता होते. त्या आठवणी हृदयात साठवून नव्या वर्षाच्या लढाईसाठी कोकणी माणूस नव्या हुरूपाने पुन्हा सज्ज होतो.**

**भोंगऱ्या**

नंदुरबार जिल्ह्यातल्या आदिवासी समाजात होलिकात्सोवाचं महत्व मोठं आहे. धडगाव इथं होळीच्या उत्सवाची सुरवात असणारा भोंगऱ्या उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. पाचशे वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या या उत्सवात पोलीस पाटलांची पारंपरिक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. भोंगऱ्या उत्सवानंतर आदिवासी बांधवांच्या होळी उत्सवाला सुरवात झाली.

**केळी**

पुणे जिल्ह्यात आगामी पाच वर्षात अधिकाधिक क्षेत्र केळी पिकाखाली आणण्यासाठी समूह (क्लस्टर) पद्धतीनं विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी विभागासह सर्व संबंधित विभागांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी काल या संदर्भात झालेल्या बैठकीत दिले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, पाण्याचा कार्यक्षम वापर, याचबरोबर शीतसाखळी अंतर्गत साठवण गृहे उभारणी आणि बाजार जोडणीसाठी पणन मंडळ अश्या विविध बाबींचा विचार करण्यात आला आहे.

**आरोग्य तपासणी**

सोलापूर जिल्हयात 1 ते 31 मार्च दरम्यान राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत विशेष आरोग्य तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत नवजात बालक ते 18 वर्ष वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. धाराशिव जिल्ह्यातदेखील ही मोहीम राबविण्यात येत आहे.

**क्षयरोग**

चंद्रपूर शहरात महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत क्षयरोग निर्मूलन मोहीमेअंतर्गत 634 आरोग्य शिबीरे घेण्यात आली आहेत. यामध्ये 1 लाख 23 हजार 258 नागरिकांची तपासणी करण्यात आली असून 60 नागरिक क्षयरोगग्रस्त आढळून आले आहेत.

**हवामान**

राज्यात कमाल तापमान सरासरी 36 अंश सेल्सियसच्या वर आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**